स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानव्य विद्या शाखेअंतर्गत तत्वज्ञान विषयातील पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या
शोध प्रबंधाचा संक्षिप्त आराखडा.

''डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे सामाजिक परीवर्तनाचे तत्वज्ञान एक चिकित्सक अभ्यास''

:: संशोधक ::

प्रा.गणेश रामा बुध्दे

जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय,धर्मापुरी
ता.परळी वै. जि.बीड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.राहूल ज्ञानेश्वर कापुरे

तत्वज्ञान विभाग प्रमुख तथा मार्गदर्शक
राजर्षी शाहू महाविद्यालय,परभणी
ता.जि.परभणी

शैक्षणिक वर्षे – 2022

संशोधन विषय

''डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक परीवर्तनाचे तत्वज्ञान एक चिकित्सक अभ्यास''

प्रकरण क्र.1 प्रस्तावना

प्रकरण क्र.2 डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जडण घडण (जीवनपट)

प्रकरण क्र.3 डॉ.बाबासाहेब आंबेडकर कालीन सामाजिक परीस्थिती ऐतिहासीक आढावा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व सामाजीक परीवर्तनाचे प्रयत्न.

प्रकरण क्र.4 डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक परीवर्तनाच्या विचारांचे तात्वीक स्वरूप

प्रकरण क्र.5 डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे सामाजावरील परीणाम

प्रकरण क्र.6 निष्कर्ष व सारांश.

प्रस्तावना :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे बहूआयामी व्यक्तीमत्व होते. एवढेच नव्हे तर ते एक दृष्टे सर्वहारा वर्गाच्या जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणला त्यांनी दुःखी शोषित, पिढीतांच्या मुक्तीचा विचार त्यांच्या चिंतेच्या व चिंतनाचा विषय राहिला आहे त्यांच्या विचार आणि कार्यात प्रचंड एक वाक्यता होती. बहुजनांच्या दलितांच्या मुक्तीचा विचार करताना त्यांना सामाजीक, आर्थीक, राजकिय, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व तात्विक असा सर्वांगिन विचार करणे आवश्यक होते.

या विचारातूनच त्यांच्या जिवनाचे तत्वज्ञान विकसीत झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबडेकर हे विश्व दृष्टीकोणाचे जनक मानले जातात त्यांच्या विचारात व जीवनात संपूर्ण इहवादी तत्वज्ञान अंतर्भुत असल्याचे दिसते. विशेषत, पाहिले तर बुध्दीवाद हा आंबेडकरांचा पाया आहे, तर आंबेडकरवाद हा आधुनिक काळातील बुध्दवाद होय, बुध्दवाद बुध्दाचा भौतिकवाद (प्रतित्य समुत्पाद–सिध्दांत) हा आंबेडकरवादाचा पाया आहे, तर राज्य समाजवाद हा आंबेडकरवादाचा ध्येयवाद आहे, म्हणूनच हा आंबेडकर वादाचा मुख्य सार म्हणुन सांगितला जातो.

भारतातील विविध साहित्यीकांनी लेखकांनी कवींनी, शाहीरांनी आपल्या प्रभावी परिणामकारक सर्वस्पर्शी लेखनातून विविध दिशेने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकुन बहुजन समाजात प्रभावशाली जागृती निर्माण केली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजीक, धार्मिक, राजकिय, आर्थीक, नैतिक विचार विविध विचारवंतानी आपल्या लेखणीतून मांडलेले दिसतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानामध्ये केवळ सामाजीक, धार्मिक, शैक्षणिक राजकिय, नव्हे तर संपूर्ण मानव जातीचा विकास दडलेला दिसुन येतो कारण आंबेडकर तत्वज्ञान हे मानव केंद्रीत आहे. मानवच हा त्यांचा मुख्य केंद्रबिंदु आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकुण तत्वज्ञानातील मुख्य केंद्र म्हणजेच त्यांचे सामाजीक, धार्मिक, राजकिय व शैक्षणिक असे चार पैलू आहेत. त्यांनी

आपल्या तत्वज्ञानात या चार गोष्टीलाच महत्व दिल्याचे दिसून येते. त्यांनी वेळोवेळी मांडलेल्या विचारातून त्यांचे तत्वज्ञान अभिव्यक्त झालेले आहे.

अनेक अभ्यासकांनी व थोर विचारवंतानी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजीक, धार्मिक, राजकिय व शैक्षणिक विचारावर लेखन केलेले दिसून येते. परंतू त्यांच्या या तत्वज्ञानाची सुत्रबध्द मांडणी कुणीही केलेली नाही. तसेच तत्वज्ञान या विषया अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक परीवर्तनाचे तत्वज्ञान या विषयावर कुणीही संशोधन केले नसल्यामुळे मी आंबेडकर तत्वज्ञानातील एक गाभा (गाढा) विषय म्हणुन त्यांचे सामाजीक परीवर्तनाचे तत्वज्ञान प्रस्तुत संशोधना करीता विषय निश्चित केला आहे.

आंबेडकर तत्वज्ञान सामाजिक परीवर्तनाचे तत्वज्ञानात आवड असणाऱ्या करीता आणि भारतीय सामाजिक क्षेत्रातुन अध्ययन करणाऱ्याकरीता हे संशोधन निश्चित उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

संशोधनाच्या समस्या : **(Research Problem)**

1. प्रचलीत सामाजिक तत्वज्ञानास मुलभूत, विकासात्मक बदल करण्याची क्षमता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक तत्वज्ञानातुन दिसुन येते.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजीक तत्वज्ञानाची एकत्रीत व सुत्रबध्द मांडणी झालेली नाही.
3. याच एकत्रीत व सुत्रबध्द मांडणी अभावी त्यांचे सामाजिक तत्वज्ञान हा महत्वाचा अभ्यास विषय बनलेला नाही.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक तत्वज्ञानाचा शोध घेवुन त्याची सुत्रबध्द मांडणी करणे आवश्यक आहे.

संशोधनाची उदिष्टये : **(Objectives of Research)**

प्रस्तूत अध्ययना करीता खालील उद्दिष्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक तत्वज्ञान एकत्रीत व सुत्रबध्द स्वरूपात प्रतीपादन करणे.

2. त्यांचे सामाजिक परीवर्तनाचे विचार हे क्रांतीकारी विचार आहे हे तत्व अधोरेखीत करणे.
3. डॉ. आंबेडकरांचे सामाजिक परीवर्तनाचे मत अधोरेखीत करणे.
4. बहुजन, शेतकरांच्या, दलीत, शोशीत, स्त्रीया व पिढीत वर्गाच्या सामाजीक परिवर्तनाचे व उन्नतीचे सुचवलेले मार्ग अधोरेखीत करणे.

संशोधनाची गृहितके : **(Research Hypothesis)**

प्रस्तुत संशोधना करीता खालील गृहितके निश्चित करण्यात आली आहेत.

1. तथागत बुध्द, संत कबीर, म, कबीर यांच्या विचारांचे अधिष्ठान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, धार्मीक व राजकीय तत्वज्ञानास लाभलेले आहे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक परिवर्तनाचे तत्वज्ञान उपेक्षीत राहीलेले आहे.
3. या तत्वज्ञानात उपेक्षीतांच्या मदतीचा मार्ग सामावलेला आहे.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजीक तत्वज्ञानात मुलभूत सिध्दांत अंतर्भुत आहेत.
5. हे एक शुध्द इहवादी तत्वज्ञान आहे.
6. डॉ. आंबेडकरांचे सामाजिक परीवर्तनाचे तत्वज्ञान, समाजाच्या उन्नती व विकासाकरीता मार्गदर्शक ठरू शकते.
7. या तत्वज्ञानाला वैज्ञानिक अधिष्ठान आहे.
8. या तत्वज्ञानात विज्ञानासोबत नैतीक मुल्यांची सांगड घातली आहे.
9. सद्यकालीन परिस्थितीत हे तत्वज्ञान मुलभूत स्वरूपात मार्गदर्शक आहे.
10. या तत्वाचा शोध घेतला जाईल या अनुशंगाने त्यांच्या तत्वज्ञानाचे संदर्भ येतील हिच या विषयीची मर्यादा असेल.

अध्यायन पध्दती : **(Research Methodology)**

प्रस्तुत संशोधनाकरीता विषयाच्या आवश्यकते नुसार ऐतीहासीक तात्वीक, तुलनात्मक, विश्लेषनात्मक संशोधन पध्दतीचा आवलंब केला

आहे. तसेच प्रस्तुत संशोधन प्राथमिक साधने, व्दुतीय साधने यावर आधारित असेल.

संशोधन विषयाची व्याप्ती : (Scope of the Research Topic)

प्रस्तुत अभ्यास विषयाच्या व्याप्तीमध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, लेख, ग्रंथ यातुन त्यांच्या सामाजिक परिवर्तनाचे तत्वज्ञानाचा शोध घेणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक परिवर्तन शोध घेणे.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकुण तत्वज्ञानातील केवळ सामाजिक परीवर्तनाचे तत्वज्ञान प्रस्तुत संशोधनाचा विषय असल्यामुळे केवळ त्यांच्या सामाजिक परीवर्तनाच्या संबंधीत विचारांचा आढावा घेणे व त्यांच्या सामाजिक परीवर्तनाचे तत्वज्ञान अधोरेखीत करणे ही या संशोधनाची व्याप्ती असे.

तथ्य संकलन : (Data Collection)

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलना करीता प्राथमिक साधने व व्दितीय साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः केलेले सामाजिक भाषणे,धार्मिक विचार,त्यांनी लिहीलेले लेख व ग्रंथ यांचे अध्यापन केले आहे.

2) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय व शैक्षणिक विचारावर विविध अभ्यासकांनी लिहीलेल्या ग्रंथाचे अध्यायन केले आहे.

3) या अनुषंगाचे सामाजिक, धार्मिक, राजकीय व शैक्षणिक विषयक इतर ग्रंथाचे अध्यापन केले आहे.

4) ग्रंथालयीन साहित्यातुन शोध निबंधातुन मासिके, वृत्तपत्रे व इंटरनेट वरून तथ्य संकलन केलेले आहे.

संशोधनाच्या मर्यादा : (Limitations of Research)

1. प्रस्तुत संशोधनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, धार्मीक, राजकीय व समाज परिवर्तनीय तत्वज्ञानाचा आढावा घेवुन, त्यातील सामाजिक, धार्मीक राजकीय, समस्या व उपाय अधोरेखीत करणे हा या संशोधनाचा उद्देश असल्यामुळे आंबेडकरवाद एक परिपूर्ण तत्वज्ञान असले तरी प्रस्तुत संशोधनात त्याचे महत्वाचे पैलू म्हणुन, सामाजिक परिवर्तनाचे तत्वज्ञान अधोरेखीत करणे.
2. डॉ.बाबासाहेब आंबेडरांचे सामाजिक परिवर्तनाचे तत्वज्ञान उपेक्षीत राहीलेले सिध्द करणे.
3. समाजिक परीवर्तनातुन दलित, शोषीत, शेतक·यांच्या, स्त्रियांच्या उन्नतीसाठी बाबासाहेब आंबेडकरांचे मार्गदर्शक तत्वे दाखवुन देणे.

संशोधनाचा आराखडा :

प्रकरण – प्रस्तुत संशोधन आराखडा एकुण पाच प्रकरणात विभागलेला असुन संशोधन, प्रबंधाच्या स्वरूपाच्या आकलना करीता त्यातील आशयांचे प्रकरण निहाय, थोडक्यात विवेचन खालील प्रमाणे निश्चीत करण्यात आलेले आहे.

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व ऐतीहासीक सामाजीक परिस्थीतीचा आढावा प्रस्तुत प्रकरणामध्ये घेण्यात येईल.

2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जडणघडण व जीवनपट प्रस्तुत प्रकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ज्या ऐतीहासीक व समकालीन परिस्थीत व विचार विश्वात जडणघडण झालेली आहे. त्यातुन त्यांच्या सामाजीक, राजकीय तत्वज्ञान निश्चीत झाली आहे. याचा आढावा घेलेला आहे.

3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक परीवर्तन वादी तत्वज्ञान प्रस्तुत प्रकरणामध्ये तत्कालीन सामाजीक परिस्थितीत व त्यातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजीक परीवर्तनाची तत्वज्ञानाची झाालेली निर्मीती या संबंधीचा आढावा यात घेण्यात आलेला आहे.

4. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारातुन समाजावर पडलेला परीणाम प्रस्तुत प्रकरणामध्ये आंबेडकरांच्या विचारातुन समाजात घडलेला बदल आधोरेखीत करण्यात येईल.

5. निष्कर्ष –

वरील सर्व प्रकरणात प्राप्त झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामजिक परीवर्तनातुन व त्यांच्या तत्वज्ञानातुन संबंधीचे निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात मांडले आहे.

संदर्भ सूची :

1. गायकवाड प्रदिप (1995) महाडचा सत्यागृह आणि मनुस्मृती दहन,क्षितीज पब्लिकेशन,नागपूर
2. कांबळे नारायण (2002) प्रखर राष्ट्रवादी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आंबेडकर योजना.
3. धनंजय कीर,(2011) डॉ.बाबासाहेब आंबेडकर पॉप्युलर प्रकाशन,मुंबई.
4. कठारे दुष्यंत (2016) महामानवाचा महाग्रंथ,यशोदीप प्रकाशन पुणे.
5. खरात शंकरराव (1990) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर,रौप्य महात्सवी प्रकाशन पुणे
6. खैरमोडे चां.भ.,डॉ.भिमराव रामजी आंबेडकर खंड 1ते12,सुगावा प्रकाशन पुणे 2002
7. रघुवंशी रमेश,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची गाजलेली भाषणे.रघुवंश प्रकाशन 242 पुणे
8. इंगोले यु.पी.फुले,शाहु आंबेडकरांची शैक्षणिक क्रांती,आशिष प्रकाशन यवतमाळ 2002
9. Jarode Dinesh (2017) Buddist Philosophy, Present Situation & Improtance, paygan Publication, Amravati.
10. नरेंद्र जाधव,आमचा बाप आणि आम्ही जनावृत्ती 2007ण ग्रंथाली प्रकाशन मुंबई.
11. सुधीर प्रकाशन डॉ.बाबासाहेबांची अतिशय गाजलेली भाषणे,
12. लोकराज्य धम्मचक्र परिवर्तन सुवर्ण विशेषांक,ऑक्टोबर 2006 माहिती व जनसंपर्क माहिती संचालनायलय मुंबई.

13. डॉ.नागोराव कुंभार, संपा, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक तत्वज्ञान.
14. निबाळंकर वामन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा प्रबोध प्रकाशन नागपूर 2007
15. दहाड धनराज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भाषणे व विचार खंड संकेत प्रकाशन नागपूर 2004
16. शुद्र मुळचे कोण होते. रघुनवंशी रमेश,पुणे
17. म्हसदे सुनिल,प्रकाशक महार आणि त्यांचे वतन,सुमेध प्रकाशन पुणे. 2007
18. विजय जाधव,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विद्यार्थ्याना संदेश,रघुवंशी प्रकाशन 1998
19. यु.पी.इंगोले दलितांचे शिक्षण आशिष प्रकाश दि.15.ऑगस्ट 2002
20. चा.म.खैरमोडे यांचा ग्रंथ सुगावा प्रकाशन पुणे.

:: संशोधक ::

प्रा.गणेश रामा बुध्दे
जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय,धर्मापुरी
ता.परळी वै. जि.बीड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.राहूल ज्ञानेश्वर कापुरे
तत्वज्ञान विभाग प्रमुख तथा मार्गदर्शक
राजर्षी शाहू महाविद्यालय,परभणी
ता.जि.परभणी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानव्य विद्या शाखेअंतर्गत तत्वज्ञान विषयातील पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या
शोध प्रबंधाचा संक्षिप्त आराखडा.

विषय – ''डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे सामाजीक परीवर्तनाचे
तत्वज्ञान एक चिकित्सक अभ्यास''

संशोधक – **प्रा.गणेश रामा बुध्दे**
मो.नं.9421384818 Email-ganeshbudh100@gmail.com

मार्गदर्शक – **प्रा.डॉ.राहूल ज्ञानेश्वर कापुरे**
तत्वज्ञान विभाग प्रमुख तथा मार्गदर्शक
राजर्षी शाहू महाविद्यालय,परभणी
ता.जि.परभणी

शैक्षणिक वर्षे – 2022